'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 139 – ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वेगळेपण

डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ
मराठी विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सोनई, ता. नेवासा

**प्रास्ताविक –**

खऱ्या अर्थाने १९२५ नंतर जाणीवपूर्वकपणे ग्रामीण साहित्य निर्मितीस सुरूवात झाली. या कालखंडातील साहित्य हे मनोरंजनवादी, स्वप्नरंजनपर स्वरूपाचे होते. मात्र पुढे १९४५ नंतर ग्रामीण साहित्यात बदल होण्यास सुरूवात झाली. ग्रामीण जीवनातील वास्तवतेचा वेध घेण्याची जाणीव ग्रामीण साहित्याला झाली. स्वातंत्र्यांतोत्तर कालखंडात खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्यात व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, आनंद यादव, रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव इ. लेखकांनी ग्रामीण साहित्य समृद्ध होऊ लागले. एकूणच ग्रामीण साहित्य हे ग्रामीण भागातूनच उदयास आल्यामुळे खेड्यातील जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे त्याचे लेखन ग्रामीण जीवनाचा वास्तवपणे वेध घेते.

**स्वरूप –**

ग्रामीण साहित्य हे कृषीकेंद्रीत आहे. त्याचे कारण या साहित्याची प्रेरणा हीच कृषी आहे. शेती व्यवसायाला पूरक असे इतर व्यवसाय येथे चालतात. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले असे म्हणतात, एकंदरीत ग्रामीणता साकार होण्यासाठी कृषीनिष्ठ संस्कृती निसर्गसन्मुखता त्यातून निर्माण झालेले लोकमानस हे घटक महत्त्वाचे ठरतात. यातून जगण्याची एक रीत तयार होत जाते. या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते ते ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल.

निसर्ग हा लहरी आहे त्याप्रमाणे खेड्यातून, शेतीतून यंत्राचा वापर सुरू झाल्याने, आधुनिकीकरण आणि १९९० नंतरचे डॉ. आनंद यादवांचे काही ग्रामीण कथासंग्रह आले, त्यामध्ये शेतकरी, शेतमजूर पुरूष–स्त्रियां यांचे वास्तव रूप कथासंग्रहारूपाने आले. डॉ. राजन गवस, डॉ. इंद्रजित भालेराव, डॉ. रविंद्र ठाकूर, डॉ. तानाजी पाटील इ. लेखकांनी आपल्यासाठी ग्रामीण साहित्यामध्ये वास्तवता प्रकट केली. त्यांच्या लेखनाने नवे वळण घेतले.

१९७७ पासून अधिकपणे ग्रामीण साहित्य चळवळीला प्रारंभ झाला. सन २०१४ ग्रामीण साहित्याच्या चळवळीला ३७ वर्षे पूर्ण झाले. १९७७ मध्ये ग्रामीण साहित्य चळवळीची उद्दिष्ट्ये सांगताना डॉ. आनंद यादव म्हणतात, "पूर्व सूरींच्या साहित्याचे नव्याने मुल्यमापन वर्तमान समाजाचे बदलते वास्तव, या विषयाचे प्रश्न, समस्या यांचे विवरण, सर्वांगीण लेखनासाठी लेखकाला कोणत्या स्वरूपाचे आत्मभान येण्याची गरज आहे त्याची मीमांसा नव्या ग्रामीण साहित्याची दिशा काय असू शकेल त्याचा आलेख काढणे नव्या लेखकांच्या जाणिवा अधिक समृद्ध करण्यासाठी लेखन शिबिरे, समीक्षा शिबिरे, मेळावे, साहित्य संमेलने भरविणे, नव्या प्रेरणांचे साहित्य व समीक्षा प्रसिद्ध करण्यासाठी माध्यमे उपलब्ध करून देणे इ. या व अशा स्वरूपाची उद्दिष्ट्ये समोर ठेऊन ग्रामीण साहित्याची चळवळ वाटचाल करू लागली.



Scanned with CamScanner

मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य असे दोन महत्त्वाचे प्रवाह आहेत. या दोन्ही प्रवाहांच्या प्रेरणा वेगवेगळ्या आहेत. दोन्ही प्रवाहांचे स्वरूप वेगळे आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या दोन्ही प्रवाहातील साहित्यनिर्मिती मागील प्रेरणा वेगवेगळ्या आहेत.

**ग्रामीण साहित्य आणि सामाजिकता –**

मराठी कादंबरीची सुरूवात 'यमुनापर्यटन' या कादंबरीने सुरूवात झाली. या कादंबरीत विधवा स्त्रियांची शोकांतिका मांडली आहे. समाजातील अनिष्ट प्रथा, रूढी यांनी ग्रस्त असेलेला समाज स्त्रियांचे शोषण कसा करीत होता याचे चित्रण या कादंबरीत प्रभावीपणे व्यक्त होते.

समाजाच्या बदलत्या स्थितीगतीचे साद–पडसाद हे साहित्यात पडतात. समाजशास्त्रीय दृष्टीने त्याचा अभ्यास करता येतो. समाजशास्त्राच्या दृष्टीने मराठी कादंबरीकडे पाहिल्यानंतर मराठी कादंबरी विकसित कशी होत गेली त्याचा आलेख उभा राहतो.

**समारोप –**

ग्रामीण साहित्याच्या निर्मिती वेगवेगळ्या प्रेरणांचा कालखंडानुसार शोध घेत येतो. प्रत्येक कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वातावरणानुसार या प्रेरणामध्ये बदल झालेला दिसतो. एकंदरीतच समतेचा आणि मानवतेचा विचार घेऊन थांबलेले आहे. जुन्या–नव्या विचारांचा संक्रमण अवस्थेत त्याची वाटचाल सुरू आहे. माणसे बदलली की, साहित्य बदलते, म्हणजेच माणसाची जीवनशैली बदलली की त्या कालखंडानुसार लेखकाला आपले साहित्य बदलावे लागते. देशामध्ये, राज्यामध्ये अति दुष्काळ, अतिशय पाऊस, गारांचा पाऊस, कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ यांनी समाज होरपळून निघल्याने चित्र संबंधित साहित्यामधून दिसून आले आहे.

RESEARCHJOURNEY

**संदर्भ**

१. ग्रामीण–दलित साहित्य, डॉ. मधुकर मोकाशी
२. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, चंद्रकुमार नलगे
३. ग्रामीण कथा – स्वरूप आणि विकास, डॉ. वासूदेव मुलाटे
४. मराठी ग्रामीण कादंबरी, डॉ. रविंद्र ठाकूर



Scanned with CamScanner